# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
## माहिती व जनसंपर्क विभाग
## (वैद्यकीय आरोग्य विभाग)

---

दिनांक २६/०९/२०२०

# प्रेस नोट

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार कोव्हिड-१९ नियंत्रण करण्याकरिता **"माझे कुटुंब माझी जबाबदारी"** ही मोहिम राबिण्यात येत आहे. सदर मोहिम अंतर्गत शहरातील प्रत्येक घरोघरी भेट देवुन नागरिकांची आरोग्य तपासणी व व्यक्तीश: भेटून आरोग्य शिक्षण दयावयाचे आहे. सदरची मोहिम दिनांक १५/०९/२०२० ते २५/१०/२०२० या कालावधी मध्ये राबविण्यात येत आहे. त्यानुसार सदर मोहिमेचा पहिला टप्पा दिनांक १५/०९/२०२० ते १०/१०/२०२० या कालवधीत प्रभावीपणे राबविण्यात येत आहे व दुसरा टप्पा दिनांक १४/१०/२०२० ते २५/१०/२०२० याकालावधीत राबविण्यात येणार आहे. सदर मोहिमेबाबत जनजागृती होण्यासाठी शहराच्या सकृत दर्शनी भागांवर बॅनर्स, होर्डिग व पोस्टर लावण्यात आले आहेत.

सदर मोहिमेकरिता नागरिकांची आरोग्य तपासणी करण्याकरिता १८८ पथकांची नियुक्ती महानगरपालिके मार्फत करण्यात आलेली आहे. सदर पथकांमध्ये एक आरोग्य कर्मचारी व स्थानिक लोकप्रतिनिधी मार्फत नियुक्त केलेले दोन स्वयंमसेवक (एक पुरुष व एक महिला) यांचा समावेश करण्यात आलेला आहे. नियुक्त पथकास आरोग्य तपासणी किट (Pluse Oximeter, Thermal Scanner Gun, Sanitizer, Gloves, Mask व आवश्यक औषधे ) व CSR निधीमधून टि-शर्ट व कॅपचे वाटप करण्यात आले आहेत. यानुसार एक पथक दररोज ५० घरातील नागरिकांचे आरोग्य तपासणी करत असून आरोग्य शिक्षण देत आहेत व कुटुंब सर्व्हेक्षण करण्यात येत आहे. सदर मोहिमे अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकुण १,४०,९८१ घरांचे, ५,७५,९१३ लोकसंख्येचे आरोग्य तपासणी व सर्व्हेक्षण करण्यात येत आहे. सद्यस्थितीमध्ये दिनांक २५/०९/२०२० रोजी पर्यत् झालेल्या सर्व्हेक्षणामध्ये २४६६३ घरांना भेटी देण्यात आलेल्या आहेत. तसेच आरोग्य तपासणी करुन तसा अहवाल मोबाईल ॲपमध्ये नोंदविण्यात येत आहे.

सदर मोहिमेचा शुभारंभ मा. महापौर, मा. उप महापौर, व पदाधिकारी तसेच मा. आयुक्त यांचे उपस्थितीमध्ये करण्यात आलेला असून ही मोहिम उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

(डॉ. युवराज भदाणे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका